**राज्यात "सेवा संकल्प अभियान" राबविण्याकरीता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत इतर जिल्हा योजना (महसूली) या योजनेमधून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**नियोजन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक - डिएपी-१०२६/प्र.क्र.२४६ (ई १८४९५८१)/जिनिस -१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक:- १४ ऑक्टोबर, २०२६.

<u>वाचा</u> :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग / प्र.ना.उ. व सु., क्र.सेसंअ-२०२६/प्र.क्र.९५/ रवका-२, दिनांक ०९ सप्टेंबर, २०२६.

**<u>प्रस्तावना</u>**

सामान्य प्रशासन विभागाच्या वाचा येथील दिनांक ०९ सप्टेंबर, २०२६ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १७ सप्टेंबर, २०२६ ते दिनांक १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत राज्यात "सेवा संकल्प अभियान" राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर शासन निर्णयातील तरतूदीसंदर्भात मा. मंत्री (महसूल), मा. मंत्री (ग्रामविकास व पंचायत राज) व मुख्य सचिव यांच्यासमवेत सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, आयुक्त, महानगरपालिका/नगरपरिषदा यांच्यासोबत दिनांक ०९ सप्टेंबर, २०२६ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये -सेवा संकल्प अभियान॰ दरम्यान येणाऱ्या खर्चाकरीता DPDC फंडात आवश्यक तरतूद करण्यात यावी, असे निदेश देण्यात आले आहेत. सदर निदेशाच्या अनुषंगाने जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत  नियतव्ययातून निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यासंदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय**

सामान्य प्रशाासन विभागाच्या वाचा येथील शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांनुसार, राज्यात दिनांक १७ सप्टेंबर, २०२६ ते दिनांक १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत -सेवा संकल्प अभियान॰ अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या कालावधीत जिल्हास्तरावर राबविण्यात  येणाऱ्या उपक्रमांकरीता -जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७॰  अंतर्गत -इतर जिल्हा योजना॰ मधून एक वेळची विशेष बाब म्हणून खालील अटींच्या अधिनतेने कमाल रु.५०.०० लक्ष मर्यादेत निधी मंजूर करण्यास  शासन मान्यता देण्यात येत आहे.

(१) मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी  दिनांक १७ सप्टेंबर, २०२६ ते दिनांक १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत -सेवा संकल्प अभियान॰ अंतर्गत विविध उपक्रम राबविण्याबाबत कार्यपध्दती व मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार जिल्हास्तरावर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांकरिता निधी अनुज्ञेय राहील.

(२) सदर उपक्रम राबविण्याकरिता सक्षम प्राधिकाऱ्याची प्रशासकीय व वित्तीय मान्यता असणे आवश्यक राहील.

(३) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी सेवा संकल्प अभियान अंतर्गत वरील (१) व (२) नुसार राबविण्यात आलेल्या उपक्रमांनाच आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन दयावा.

(४) जिल्ह्यातील संबंधित यंत्रणांनी उपक्रमांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी प्रचलित प्रशासकीय व वित्तीय नियमांचे पालन करुन खर्च करण्याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे निधी खर्चासंबंधीचे उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांना सादर करावे.

२. दिनांक १७ सप्टेंबर, २०२६ ते दिनांक १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत जिल्हास्तरावर राबविण्यात आलेल्या -सेवा संकल्प अभियान॰ अंतर्गत उपक्रमांचा, उपक्रम निहाय सविस्तर अहवाल जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी दि.३० ऑक्टोबर, २०२६ पर्यंत शासनास सादर करावा.

३. सदरहू शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६१०१४१५४३५४८११६ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

NITIN BHANUDAS KHEDKAR

Digitally signed by NITIN BHANUDAS KHEDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, 2.5.4.20=99977b58556463dbb2db463cec9482d13f7661ed3b2a95e83e38648 5fff4c21e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CFCA827F49093860DB8AA4627DA10E31F82BD40A9631D2E0 1EC212A473A6BCA2, cn=NITIN BHANUDAS KHEDKAR
Date: 2026.10.14 15:44:50 +05'30'

**(नि.भा.खेडकर)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव,लोकभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.उपमुख्यमंत्री (रा.उ.शु) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.राज्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व विभागीय आयुक्त.
१०. सर्व जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती (सर्व).

११. सर्व महानगरपालिका आयुक्त
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१३. आयुक्त, अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई .
१४. महासंचालक, महिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
१५. सर्व सह / उप सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. विशेष आयुक्त, अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७. सर्व सह आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय.
१८. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय.
१९. सामान्य प्रशासन विभाग/ का. र व का -२, मंत्रालय,मुंबई
२०. निवड नस्ती, नियोजन विभाग/ का.१४८१.